# गोड गोड भावगीतें




म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १३८४
REFBK-0009393
REFBK-0009393

जय हिन्द प्रकाशन मुंबई



# संपादक

— ग. का. रायकर



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# गोड गोड भावगीतें

## भाग चौदावा

संपादक : गजानन काशीनाथ रायकर

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २

★ ★ ★ मूल्य ४ आणे ★ ★ ★

REFBK-0009393

# गीतमाला


| | | | |
|---|---|---|---|
| उठी गोविंदा उठी गोपाळा | ... | ... | ३ |
| कृष्ण माझी माता | ... | ... | ४ |
| विठ्ठल गीतीं गावा | ... | ... | ५ |
| गोड गोड अभंग | ... | ... | ६ |
| गोड गोड गौळणी | ... | ... | ७ |
| चालल्या काशीला कावडी | ... | ... | ८ |
| मंगल प्रभातचे गोड गोड अभंग | ... | ... | ९ |
| उदंड क्षेत्रांची पाहिली रचना | ... | ... | १० |
| तुझी सेवा करीन मनोभावें | ... | ... | ११ |
| येत्यें पंढरीला तुझ्या मी विठ्ठला ! | ... | ... | १२ |
| धागा धागा अखंड विणुंया | ... | ... | १३ |
| विठ्ठलाचें नांव घ्या हो ! | ... | ... | १३ |
| दीन पतित अन्यायी | ... | ... | १४ |
| चला आळंदीला जाऊं | ... | ... | १४ |
| रामकृष्ण गोविंद नारायण हरि | ... | ... | १५ |
| सख्या पंढरीच्या राया | ... | ... | १५ |
| सांगते मीरा | ... | ... | १६ |
| उद्यां श्रीराम येणार | ... | ... | १७ |
| बहरला पारिजात दारीं | ... | ... | १८ |
| स्वप्नांत पूजिलें ज्यास गडे ! | ... | ... | १९ |
| गगनीं अर्धा चंद्र उगवला ! | ... | ... | २० |
| संकटीं पडले श्रीरघुनाथ ! | ... | ... | २१ |
| तुम्हां वांचुनी मला न सुचतें ! | ... | ... | २२ |
| कधीं रे येशिल रामा घरीं | ... | ... | २३ |
| मी राजाची राणी झालें | ... | ... | २४ |
| कोण आला प्रिया ही ओळखा | ... | ... | २५ |
| दिवाळी तेथें लखलखली ! | ... | ... | २५ |
| मेनका भूवरीं उतरे | ... | ... | २६ |
| सांग पत्रिके निरोप माझा | ... | ... | २६ |
| आला ग ऋतु वसंत आला | ... | ... | २७ |
| रुसूबाई रुसू कोपऱ्यांत बसू | ... | ... | २८ |
| पण वर माला पडणार कधीं ? | ... | ... | २९ |
| घट डोईवर घट कमरेवर | ... | ... | ३० |
| जो आवडतो सर्वांला | ... | ... | ३० |
| सावळ्या विठ्ठला तुझ्यासाठीं | ... | ... | ३१ |
| मूर्त रूप जेथें ध्यान श्रीपतीचें | ... | ... | ३२ |



मुद्रक
ग. स. बैंदूर
जय गुजरात प्रेस
गांवदेवी, मुंबई ७

●

प्रकाशक
ग. का. रायकर
झावबाची वाडी
मुंबई २

●

मुखपृष्ठ
पेडणेकर
खोदाद सर्कल
दादर, मुंबई १४

●

प्रथमावृत्ति
२० मार्च १९५७

●

विक्रेते
जय हिंद प्रकाशन
झावबाची वाडी
मुंबई २

# उठी गोविंदा उठी गोपाळा



उठी गोविंदा, उठी गोपाळा, उष:काल झाला
हलके हलके उघड राजिवा, नील नेत्र - कमला ॥ धृ० ॥


तुझ्यापरि बघ जीवन वारा, मिठी मारतो प्राजक्ताला
धवल केशरी मृदुल सुमांचा, पाऊस अंगणीं झिमझिमला ॥ १ ॥

पर्ण पोपटी हिंदोळ्यावर, कंठ फुटतो आनंदाला
तुज भूपाळी आळवित सुंदर, चढली गगनीं विहंगमाला ॥ २ ॥

गोठ्यामधलें मुकें लेंकरूं, पीत झुरुझुरु कामधेनुला
भरला पान्हा किती आवरूं, हांसवी अरुणा तव आईला ॥ ३ ॥

अनुक्रमांक
क्रमांक ..... नों. दि.

# गोड गोड अभंग




ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधु ॥ १ ॥
अंगीं लावूनिया राख । डोळे झांकुनी करिती पाप ॥ २ ॥
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ॥ ३ ॥
तुका म्हणे सांगों किती । जळो तयांची संगती ॥ ४ ॥

कवि : संत तुकाराम ★ गायक : भालचंद्र पेंढारकर

ऊंस डोंगापरी रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥१॥
कमान डोंगापरी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा॥२॥
नदी डोंगापरी गाळ नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥३॥
चोखा डोंगापरी भाव नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥४॥


कवि : संत श्रीचोखोबामहाराज (६) गायक : विष्णुपंत पागनीस

# गोड गोड गौळणी



परब्रह्म निष्काम तो हा गौळ्यांघरीं ।
वाक्या वाळे अंदुकृष्ण नवनीत चोरी ॥ १ ॥
म्हणती गौळणी हरीचीं पाउलें धरा ।
रांगत रांगत येतो हरी हा राजमंदिरा ॥ २ ॥
लपत छपत येतो हरी हा राजभुवनीं ।
नंदाचे देव टाकूनि आपण वैसे सिंहासनीं ॥३॥
सांपडला देव्हारीं यासी बांधी दावेनीं ।
शंख चक्र गदा पद्म शारंगपाणी ॥ ४ ॥
बहुता पुण्यें जोडलें देवा ।
अनंत पवाडे तुमचे न कळती भावा ॥ ५ ॥
विष्णुदास नामा म्हणे अहो केशवा ।
जन्मोजन्मीं द्यावी तुमची चरणसेवा ॥ ६ ॥


# चालल्या काशीला कावडी !



चालल्या काशीला कावडी !
खांद्यावरती वसे आंधळ्या...मायपित्यांची जोडी !

विश्वेश्वर तो द्वारावतीचा
मिटल्या नयनीं बघावयाचा
ध्यास आपुल्या मायपित्यांचा
पुरवायाला पुत्र चालला... पुण्याई केवढी !

हंत हंत पण थांब श्रावणा
कमंडलु तव पुण्याईचा
पुरता नाहीं भरावयाचा
दशरथ राजा झाडीमध्यें... बैसला देउनी दडी !



# मंगल प्रभातचे गोड गोड अभंग

गोविंद गोविंद। मना लागलिया छंद ॥ १ ॥
मग गोविंद ते काया। भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥
आनंदलें मन। प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥
तुका म्हणे आळी। जेवीं नुरेची वेगळी ॥ ४ ॥

कवि : संत तुकाराम * * गायक : व्ही. जी. भाटकर

अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तीन्ही लोक ॥१॥
जाईन गे माये तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया ॥२॥
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन। क्षेम मी देईन पांडुरंगीं ॥३॥
बाप रखुमादेवीवरा विठ्ठलाची भेटी। आपुलीये संवसारीं घेउनी राहे ॥४॥

कवि : संत ज्ञानेश्वरमहाराज * * गायक : बालगंधर्व

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ॥ १ ॥
आइकाजी तुम्ही भक्त भागवत। कराल तें हित सत्य करा ॥ २ ॥
कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे ॥ ४ ॥

कवि : संत तुकाराम *  गायिका : कु. कुसुम रायकर

# उदंड क्षेत्रांची पाहिली रचना



उदंड क्षेत्रांची पाहिली रचना। पंढरी ते जाणा भूवैकुंठ ॥ १ ॥
तीर्थ आणि देव संतसमागम। ऐसें सर्वोत्तम कोठें नाहीं ॥ २ ॥
सागरादि तीर्थ पाहतां पाहिलें। परी मन हें वेधलें पंढरीये ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं सुखाची विश्रांती। पाहतां विठ्ठलमूर्ति लाभ बहु ॥ ४ ॥

कवि : श्रीएकनाथ महाराज ★ गायिका : सौ. सुलोचना चव्हाण

अच्युता अनंता श्रीधरा माधवा। देवा आदि देवा पांडुरंगा ॥१॥
कृष्णा विष्णु हरी गोविंदावामना। तूंचि नारायणा नामधारा ॥२॥
मुकुंदा मुरारी प्रद्युम्ना केशवा। नाम सदाशिवा शांतरूपा ॥३॥
रूपातीत हरी दाखवी सगुण। निरंतर ध्यान करी नामा ॥४॥

कवि : संत नामदेव ★  ★ गायक : सुरेश हळदणकर

# तुझी सेवा करीन मनोभावें



तुझी सेवा करीन मनोभावें वो।
माझें मन गोविंदीं रंगलें वो ॥ १ ॥

नवसीये नवसीये माझे नवसीये वो।
पंढरीचे दैवतें विठ्ठल नवसियो वो ॥ २ ॥

बापरखुमादेवीवर विठ्ठलें वो।
चित्तचैतन्य चोरुनि नेलें वो ॥ ३ ॥

कवि : श्रीज्ञानदेवमहाराज ★ गायक : व्ही. जी. भाटकर

घांव घाली विठू आतां चालूं नको मंद।
बडवे मज मारिती ऐसा कांहीं अपराध ॥ १ ॥

विठोबाचा हार तुझे कंठीं कैसा आला।
शिव्या देती महारा म्हणती देव बाटवीला ॥ २ ॥


अहो जी महाराज तुमचे द्वारींचा कुतरा।
नकाजी मोकलूं चक्रपाणी जिमेदारा ॥ ३ ॥

जोडूनियां कर चोखा विनवितो देवा।
बोलिलों उत्तरें परि राग नसावा ॥ ४ ॥

कवि : श्रीचोखोबामहाराज ★  ★ गायक : बालगंधर्व

संग्रहालय, ठाणे. स्वकब्जा
अनुक्रम 277738 आ. वि:
क्रमांक 2368 नों. दि. 30/11/48

# येत्यें पंढरीला तुझ्या मी विठ्ठला !



येत्यें पंढरीला तुझ्या मी विठ्ठला !
सोडीलें मी घर, सोडीलें सोयर
सासर माहेर तुझ्या पायरीला !
गाऊन नटून रंजवीले जन
आतां रंजवीन माझ्या माउलीला !
चंद्रभागे स्नान नित्य मी करीन
होईन पावन तुझ्या पूजनाला !

★

## धागा धागा अखंड विणुंया

धागा धागा अखंड विणुंया
विठ्ठल विठ्ठल मुखें म्हणूंया ॥ धृ० ॥

अक्षांशाचे रेखांशाचे, उभे आडवे गुंफून धागे
विविध रंगी वसुंधरेचे, वस्त्र विणलें पांडुरंगें
विश्वंभर तो विणकर पहिला
कार्या-रंभीं नित्य स्मरूंया ॥ १ ॥

करचरणांच्या मागावरती, मना-मनांचे तंतू टाका
फेकुन शेला अंगावरती, अर्धी उघडी लाज राखा
बंधुत्वाचा फिरवित चरखा
एकत्वाचें सूत्र धरूंया ॥ २ ॥

गायिका : सौ. आशा भोसले ★ कवि : पी. सावळाराम

## विठ्ठलाचें नांव घ्याहो !

विठ्ठलाचें नांव घ्याहो, घ्यावो भक्तिभावें।
पंढरीला पायीं कार्तिकीला जावें ॥ १ ॥
चंद्रभागेतीरीं विष्णुदासमेळा
भजनीं कीर्तनीं सदा रंगलेला
हर्षानें बघाया देव कोटी यावे ॥ २ ॥
अबीर गुलाल लावुनीयां भाळीं
तुळशीमाळ गळां वारकरी झाला
भक्त होऊनीयां विठ्ठलेंही यावें ॥ ३ ॥

कवि : पी. सावळाराम ★  ★ गायक : दशरथ पुजारी

## दीन पतित अन्यायी

दीन पतित अन्यायी। शरण आलें विठाबाई ॥ १ ॥
मी तों आहे यातीहीन। न कळे कांहीं आचरण ॥ २ ॥
मज अधिकार नाहीं। भेटी देई विठाबाई ॥ ३ ॥
ठाव देई चरणापाशीं। तुझी कान्होपात्रा दासी ॥ ४ ॥

कवयित्री : श्रीकान्होपात्रा ★ गायक : मास्टर कृष्णराव

## चला आळंदीला जाऊं !

चला आळंदीला जाऊं। ज्ञानदेवा डोळां पाहूं ॥ १ ॥
होतिल संतांचिया भेटी। सांगों सुखाचिया गोष्टी ॥ २ ॥
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर। मुखीं म्हणतां चुकती फेर ॥ ३ ॥
जन्म नाहीं रे आणीक। तुका म्हणे माझी भाक ॥ ४ ॥

कवि : संत तुकाराम ★ गायिका : कुसुम रायकर

आम्ही चकोर हरी चंद्रमा। आम्ही कळा तो पूर्णिमा ॥ १ ॥
कैसा बाहिजु भीतरीं हरी। बिंबें बिंबला एकसूत्रीं ॥ २ ॥
आम्ही देही तो आत्मा। आम्ही विदेही तो परमात्मा ॥ ३ ॥
ऐक्यपणें सकळ वसे। द्वैत बुद्धि कांहीं न दिसे ॥ ४ ॥
निवृत्ति चातक इच्छिताहे। हरिलागीं वरतें पाहे ॥ ५ ॥

★

कवि : श्रीनिवृत्तिमहाराज  गायक : आर. एन्. पराडकर

# रामकृष्ण गोविंद नारायण हरि



रामकृष्ण गोविंद नारायण हरी । केशव मुरारी पांडुरंगा ॥ १ ॥
लक्षुमीनिवासा पाहे दीनबंधु । तुझा लागो छंदु सदा मज ॥ २ ॥
तुझे नामीं प्रेम देई अखंडित । नेणें तप व्रत दान कांहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि गा मागणें । अखंडहि गाणें नाम तुझें ॥४॥


कवि : **संत तुकाराम** ★ गायक : **दत्ता वाळवेकर** वगैरे

# सख्या पंढरीच्या राया

सख्या पंढरीच्या राया । घडे दंडवत पायां ॥ १ ॥
ऐसें करी अखंडीत । शुद्ध प्रेम शुद्ध चित्त ॥ २ ॥
वेध माझ्या चित्ता । हाचि लागो पंढरीनाथा ॥ ३ ॥
जाई ओवाळुनी । जन्मोजन्मीं म्हणे जनी ॥ ४ ॥

कवयित्री : **श्रीजनाबाई** ★  ★ गायक : **मास्टर कृष्णराव**

# सांगते मीरा



सांगते मीरा, माई मी वरिलें यदुवीरा !
मी सर्वांगी झालें पिवळी
उभा मनोहर माझ्या जवळी
त्रिभुवनसुंदर शंख चक्रधर शोभे मज नवरा ॥ १ ॥

अक्रुर उद्धव आप्त मंडळी
नणंद राधा व्याही गवळी
देव हर्षती शिरीं वर्षती अमृतरसधारा ॥ २ ॥

आनंदाची धून लागली
मी नंदाची सून साजुली
सासरीं जात्यें मी मथुरेतें कालिंदीतीरां ॥ ३ ॥

★

कवि : ग. दि. माडगूळकर (१६) गायिका : मधुबाला जव्हेरी

# उद्यां श्रीराम येणार



लतांनो सांगु का तुम्हा...उद्यां श्रीराम येणार ! धृ०

वनाला सर्व या आतां...खरा आनंद होणार !
तुम्हां कोठूनियां ठावा...कसा श्रीराम तो आहे
सुगंधी झरा येथें...सदाचा वाहतो आहे
उद्यां श्रीराम येऊं दे, उद्यां श्रीराम येऊं दे, तुम्हांला मीच दावीन
मुखें लागाल घोकाया 'जय श्रीराम श्रीराम' ! १

लतांनो घालना पुष्पें...झऱ्यांनो घाल ना पाणी
पहा हीं अर्पिलीं कैसीं...फळें या थोर वृक्षांनीं
नव्हे कोठूनही उष्टीं...जराशीं चावलेलीं मी
कडू कच्चीं फळें रामा...कशीं देऊं ग बाई मी
उद्यां श्रीराम येईल...तुम्हांला मीच दावीन
फळें हीं त्यासी अर्पूनी...सुखें त्या पायीं लोळीन ! २

★

# बहरला पारिजात दारीं !



बहरला पारिजात दारीं, फुलें कां पडती शेजारीं ! धृ०
माझ्यावरतीं त्यांची प्रीती
पट्टराणी जन तुजला म्हणती
दुःख हें भरल्या संसारीं ! .................. १
असेल का हें नाटक यांचें
मज वेडीला फसवायाचें
कपट कां करिती चक्रधारी ? ................ २
वारा वाही जगासारखा
तिचाच झाला पाठीराखा
वाहतो दौलत तिज सारी ! ................ ३

कवि : ग. दि. माडगूळकर (१८) गायिका : रोशनतारा तळपदे

# स्वप्नांत पूजिलें ज्यास गडे !

**स्वप्नांत पूजिलें ज्यास गडे, तें रूप ठाकलें आज पुढें !**

भरीव मूर्ती, कोरिव डोळे
जितके मिस्किल, तितके भोळे
भाळीं कुंतल धुंद मोकळे
नयनांस माझिया भूल पडे ॥ १ ॥

अनोळखी तें लोभस हंसणें
वीरोचित तें सुंदर बसणें
वरि संकोचें कुशला पुसणें
कां उत्तर माझ्या अधरिं अडे ॥ २ ॥

मलाच माझी दशा कळेना
स्थिरावली ग नजर वळेना
पापणि त्याची जरा चळेना
ढळतसे पदर कां हृदय उडे ॥ ३ ॥

★

कवि : ग. दि. माडगूळकर  गायिका : मधुबाला जव्हेरी

# गगनीं अर्धा चंद्र उगवला !

गगनीं अर्धा चंद्र उगवला, मोहरलें चांदणें
अडली वाणी, मिटे पापणी, मिटलीं ग लोचनें
राहिलें अर्ध्यावर बोलणें !

प्रथम बोललें तेच कांहींसें
मला न सुचलें उत्तर कैसें
भलत्या वेळीं कसें बाई ग
आठवलें लाजणें !

धीर धरुन मी पुसतां कांहीं
अस्फुट त्यांचें उत्तर येई
शब्दांहुनही अधिक बोलकें
झालें मग पाहणें !

एक हांक ये दुरुनी साधी
सिद्धीपूर्वी सुटे समाधी
पुन्हा न जमलें कधीं त्यापरी
एकान्तीं भेटणें !

★

# संकटीं पडले श्रीरघुनाथ !

भाऊजी धांवा गहन वनांत, संकटीं पडले श्रीरघुनाथ !

धांव लक्ष्मणा, धांव काननीं
धांव लाडके जनकनंदिनी
आर्त स्वर हा येतो कानीं
प्रतिध्वनि घुमतो गिरीगुहरांत ॥ १ ॥

१३९३

कसला करतां विचार आतां
धनुर्बाण घ्या उचला माता
मुक्त करा जा माझ्या कान्ता
साधिला कोणीतरी वनिं घात ॥ २ ॥

कां घुटमळतां, काय थांबतां
धरून शांतता काय पहातां
काय इच्छितां अग्रज-घाता
धरुनियां सीता-लोभ मनांत ॥ ३ ॥

★

# तुम्हावांचुनी मला न सुचतें !

तुम्हावांचुनी मला न सुचतें, नर्तन गायन कला
पवनावांचुनी सुगंध सुचतो, कधिं कां कलिका फुला !
एक मागणें म्हणुन मागतें, पसरुनिया अंचला
नका सोडून जाऊं मला — ॥ १ ॥


तुम्हावांचुनी गंध येईना, धुंद केतकी — दलां
तुम्हांसंगतीं सुगंध सुटतो, माझ्या मृदु कुंतलां
स्नेह असा आपुला — ॥ २ ॥

तुम्हांवांचुनी वसंत येतां, नयन सांडिती जलां
तुम्हांसंगतीं शिशिर बांधतो, कळ्याफुलांचा झुला
कंठीं ये कोकिला — ॥ ३ ॥

तुम्हांसंगतीं स्वर्गसुधा ही, शिवनिर्माल्यें मला
तुम्हांसंगतीं आणवीन मी, नंदनवन भूतला !
प्राणप्रिया प्रेमला — ॥ ४ ॥

★

# कधीं रे येशिल रामा वनीं



मानसपूजा करिते शबरी जागेपणीं स्वप्नीं ।
कधीं रे येशिल रामा वनीं ॥

उरलासी तूं जलस्थल व्यापून
कसलें करतें मी तुज आवाहन
सर्वाधारा, तुला बैसवूं कसल्या हिंस सिंहासनीं ॥ १ ॥

आचमना तव अपुरे सागर
अमल अमर तूं त्रिभुवनसुंदर
तुझ्या कपाळीं कशास करतें मी तिलक उगा चंदनी ॥ २ ॥

कमल चरण तूं कमल-लोचना
काय पुजूं तुज वाहुनि सुमनां
काय आरती करतो रविशशी असति तुझ्या वदनीं ॥ ३ ॥

तूं राजा मी दीन दरिद्री
तुषार मी तर तुझा समुद्रा
सगुणरूप तव तरी बघावें वाटे या नयनीं ॥ ४ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर *  * गायिका : सुमन हेमाडी

# मी राजाची राणी झालें

आज चांदण्याहूनी शितळलें वैशाखाचें ऊन ग
मी राजाची राणी झालें, श्रीमंतांची सून ग
आज रुजामे पायाखालीं, हाताखालीं दासी ग
मीच माझिया मनास पुसतें, कुठें सुंदरी जाशी ग
स्वर्गसुखीं मज घेउनि जाते, सुख सुनईची धून ग ॥ १ ॥

संगमरवरी रुंद पायरी वरती पाऊल एकच ग
कोण उभे हे समोर तिकडे, नजर लाजरी फेंकच ग
त्यांच्यापुढची भेट प्रीतिची सुंदर स्वप्नाहून ग ॥ २ ॥

अंगकांतिहून नितळ नेसणें, पदर भरजरी सोड ग
अलिंगनांतील आनंदाहुनी अमृत कुठलें गोड ग
अननभूत तो अनुभव आला, देवी आपणहून ग ॥ ३ ॥

पाऊल तेथें फुलबाई ग, बोलशील तें गाणें ग
दिसेल तें तें हंसलें होईल हात लावतां सोनें ग
आज सुखाला अंकुर फुटले अंगाअंगांतून ग ॥ ४ ॥

★

## कोण आली प्रिया ही ओळखा !

भरजरी नवखा लेवुनी बुरखा, कोण आली प्रिया ही ओळखा ?

हिरवा पल्लव, पिवळा मोहर
लाज शेंदरी मृदु गालांवर
कोमल कंठीं पंचम सुस्वर
नव्हे कोकिळा, नव्हे सारिका !
मोर-पिसांचा मंच उभारी
छुम छुम पायीं घुमे घुंगरी
मोहक मादक नृत्य मयूरी
नव्हे मोहिनी, नव्हे मेनका !
सौंदर्याला वेड लाविते
बिंब बिलोरी चित्र काढते
अनुरागाला ओळख देते
अनामिका ही कोण सुरेखा ?

## दिवाळी तेजें लखलखली !

स्वर्गधरेचें उजळित अंतर, भूवरीं अवतरली
दिवाळी तेजें लखलखली ! ॥ ध्रु० ॥
प्रकाश फुलतां दीपकळ्यांतुन
तेजोवलयीं हंसलें जीवन
घराघरांतून मनामनांतून प्रीत सुगंधी दरवळली ! ॥
चिंतामणिची अपूर्ण माला
पूजित गृहिणी पतिदेवाला
ओवाळुनी ती गात आरती करींचीं कमळें किणकिणलीं ! ॥
मन आनंदुन या वहिणीचें
भावाभंवतीं दिनभर नाचे
मिठी मारितां, घांस घालितां कोर बीजेची गहिवरली ! ॥

# मेनका भूवरीं उतरे

मेनका भूवरीं उतरे, स्वरूपाचे तुटती तारे ! ! ॥ धृ० ॥

भावना रूप चंद्राची, कामना भूप इंद्राची
उधळीत फुलें गर्वाचीं, मदनिका रंजना विहरे !

चालते रंगढंगांत, चमकते वीज अंगांत
गरागरा रोम-रंध्रांत, फिरविते चांदणी भंवरे !

बोलते धुंद डोळ्यांत, हांसते मंद गालांत
लाजरा लोभ रागांत, प्रणयिनी जादू ही पसरे !!

# सांग पत्रिके निरोप माझा

सांग पत्रिके निरोप माझा मायपितयाला, चालली लेक लग्नाला !

देवक पुजिलें या प्रतिमेचें
तीर्थ घेतलें मी आसवांचें
काय मुलीनें मागायचें ?
आशीर्वच द्या एकुलतीला !

नाहीं मळवट, नाहीं चुडाही
मंगल सनई वाजत नाहीं
कशी तुला तर नेऊं भाई ?
झाली घाई शुभ घटिकेला !

दारीं तुझ्या मी बांधुन तोरण
तुलाच देवा, देत निमंत्रण
तुलाच केवळ साक्षी ठेवुन
वरिते वधु ही पतिदेवाला !


# आला ग ऋतु वसंत आला

आला ग आला ग ऋतु वसंत आला
चिमणा माझा भाऊराया खुदकन् हंसला ग
निर्मल रंग उसळती या मखमाली डोळ्यांत
मोहक गंध दरवळे याच्या अवखळ चाळ्यांत
हा हंसतांना हंसण्याचा मज छंदच जडला ग
चंदनी उटी लावुनी न्हाऊ घालिन मी तुजला
भाऊबीज म्हणूनी देशिल रे तूं काय मला
एकच याचें चुंबन घेतां स्वर्ग मिळाला ग
रांगत रांगत बालमूर्ती मोरपिसांशीं खेळत होती
तिथेंच वाटी एक दुधाची चुकुन एकदां पडली होती
रांगत गेला वाटीपाशीं कृष्ण चिमुकला ग

# निळ्या नभांत चाललीं

निळ्या नभांत चाललीं थव्याथव्यांत पांखरें
तयांमधून दोन जीव अलग होत कां बरें?
या जगांत बंधनें बंधनीं कुचंबणें
बंधनें झुगारुनी हें असें विसावणें
सुमनांच्या संगतींत मन उमले लाजरें
हरित या तृणावरी हरित भान सुंदरी
चल बसून झोल्यावर प्रीतीच्या दिगंतरीं
खगांसवें ढगांमध्येंच राहुं बांधुनी घरें!

# रुसूबाई रुसू कोपऱ्यांत बसूं



रुसूबाई रुसू, कोपऱ्यांत बसूं
तुमच्याशीं आमची गट्टी फू !
नाक झालं लाल, फुगले गाल
टोमॅटोसारखे हॉफ फू
आम्हीं आपले बसतों कोपऱ्याला
येऊं नका आमच्या वाटेला
वरून रुसवा, आंतून गोडवा
गालांतल्या गालांत खुसू खुसू खुसू !
डोळ्यांत रागाच्या कडाडल्या वीजा
चला चला लौकर दहा आंकडे मोजा
रुसू बाई रुसू बाई १-२-३-४
कोपऱ्यांत बसूं ५-६-७-८
तिकडून आला नवरा, खुदकन हसूं !

★

## पण वरमाला पडणार कधीं ?

तूं नजरेनें 'हो' म्हटलें मग वाचेनें वदणार कधीं?
कर पडलेत गळ्यांत तुझे पण, वरमाला पडणार कधीं?
तुझें हासरें हृदय आठवित दुःखाची विसरते घडी
या हृदयाचा त्या हृदयाशीं संगम रे होणार कधीं?
तूं नसतांना तुझी आठवण मना जाळीति पदोपदीं
एक विचारूं तुला, काय? होणार कधीं ग 'सप्तपदी'?

कवि : यशवंत देव ★ गायिका : सौ. आशा भोसले

## करिते जीवनाची भैरवी !

सीमा झाली सोसण्याची, परि दुःख संपलें नाहीं
करिते जीवनाची भैरवी !!

हें काय जिणें नित दुःख पिणें
रडतां रडतां सुख भासविणें
नातीं फिरलीं, प्रीती फिरली
माझें कुणी उरलें नाहीं !

मज तार आतां वा मार अतां
मन बावरलें तनु सावरतां
ही काय दशा हे परमेशा
ये धांवुनिया लवलाही !

★

## घट डोईवर घट कमरेवर

घट डोईवर घट कमरेवर, सोडी पदरा नंदलाला धृ०

कुणितरी येईल, अवचित पाहील
जातां जातां आगही लावील, सर्व सुखाच्या संसाराला !

हलता कलता, घट खिदळता,
लज्जेवरती पाणी उडता नकोच होईन मीच मला !

केलीस खोडी, पुरे एवढी,
जोंवर हंसते मनांत गोडी हंसुनि तूंही हो बाजूला !

★

## जो आवडतो सर्वांला

जो आवडतो सर्वांला, तोचि आवडे देवाला ॥ धृ० ॥

दीन भुकेला दिसतां कोणी, घांस मुखींचा मुखीं घालुनी
दुःख नेत्रींचें घेतां पिउनी, फोडी पाझर पाषाणाला !

घेऊनि पंगु अपुल्या पाठीं, आंधळ्याची होतो काठी
पायाखालीं त्याच्यासाठीं, देव अंथरी निज हृदयाला !

जनसेवेचें बांधुन कंकण, त्रिभुवन सारें घेई जिंकुन
अर्पुन आपुलें हृद्-सिंहासन, नित भजतो मानवतेला !

★

# सावळ्या विठ्ठला तुझ्यासाठीं

सावळ्या विठ्ठला, तुझ्या दारीं आलें
विसरूनी गेलें, देहभान ॥ धृ० ॥

गोजिरें हें रूप, पाहुनिया डोळां
दाटला उमाळा, अंतरीं माझ्या
तुकयाचा भाव, पाहुनि निःसंग
तारिले अभंग, तूंच देवा ॥ १ ॥

जगीं कितिकांना, तारिलेंस देवा
स्वीकारी ही सेवा, आतां माझी
कृपाकटाक्षाचें पाजवि अमृत
ठेव शिरीं हात, पांडुरंगा ॥ २ ॥

कवि : रा. ना. पवार ★ गायिका : सुमन हेमाडी

नंदाघरीं नंदनवन फुललें, बोल बोबडे श्रीरंगाचे
गोकुळांत घुमले ॥ धृ० ॥

रिंगण घाली शाम सावळा
बाळकृष्ण तो रांगत आला
हात धरुनि चालूं लागला
पुढें पुढें ग पाऊल पडलें ॥ नंदनवन फुलले ...

हात चिमुकला उंच नाचवी
छुम छुम वाळा मधुर वाजवी
स्वतः हांसुनी जगास हंसवी
कौतुक करतें गोकुळ सगळें ॥ नंदनवन फुललें...

कवि : योगेश्वर अभ्यंकर ★  ★ गायिका : सुमन हेमाडी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २७३२४३ दि: ३/०५
REFBK-0009393
REFBK-00093

# मूर्त रूप जेथें ध्यान श्रीपतीचें

मूर्त रूप जेथें ध्यान श्रीपतीचें
पंढरीला लाभे भाग्य वैकुंठींचें ॥ धृ० ॥

१२९२

धुंडित शोधित सख्या पांडुरंगा
भक्त होऊनियां आली चंद्रभागा
तीर्थ रोज घेतां देव चरणांचें
उजळे पावित्र्य जिच्या जीवनाचें ॥ १ ॥

मातापितयाच्या प्रेमाचा पाईक
पंढरीला येतां पुत्र पुंडलिक
वेड लागोनी त्यां भक्त दर्शनाचें
विटेवरी उभे द्वैत विठ्ठलाचें ॥ २ ॥

आषाढीला होतां वैष्णवाची दाटी
नाद प्रलयांत बुडे सर्व सृष्टी
युगें अठ्ठावीस बाळ देवकीचें
जोजवीत जेथें पान पिंपळाचें ॥ ३ ॥

★

क्रम ........................ वि: ....... .......

क्र ........................ नों: दि: ..............

मराठी बोलपटांत
रुपेरी पडद्यावर
झ ळ क णा ऱ्या

# नामांकित नटनटी

( लेखक : भाई भगत )

गोड गोड भावगीतांनीं ज्याप्रमाणें
रसिकांना वेड लावलें त्याचप्रमाणें
तुमच्या आवडत्या नट–नटींचीं
हीं मनोरंजक भावचित्रें
तुम्हाला पुन्हा पुन्हा वाचावीं लागतील.

दुर्गाबाई खोटे : गोविंदराव टेंबे : मिस् लीला : विनायक : मीनाक्षी बाबुराव पेंढारकर : रत्नप्रभा : शाहू मोडक : शांताबाई हुबळीकर केशवराव दाते : जयश्री : विठ्ठल : ललिता पवार : शांता आपटे विष्णुपंत पागनीस : चंद्रकांत : दामुअण्णा मालवणकर : जागीरदार लीला चिटणीस : राजन् : सुलोचना आणि बेबी शकुंतला.

या २२ नटनटींचीं चरित्रें आणि फोटो तुम्हाला फार फार आवडतील

बहुरंगीं मुखपृष्ठ : पृष्ठें ८० : मूल्य ८ आणे

जय हिन्द प्रकाशन : मुंबई नंबर २

# गोड गोड भावगीतें

बृहन्महाराष्ट्रांत पोरांपासून थोरांपर्यंत सर्वांना या भावगीतांनीं वेड लावलें असें म्हणतात. रेडियोवर हीं भावगीतें रोज ऐकावयास मिळतात. या भावगीतांचे हे संग्रह तुमच्याजवळ असले म्हणजे नाटक–सिनेमा पहाण्याची मुळींच जरुरी नाहीं.

गोड गोड भावगीतें भाग पहिला
गोड गोड भावगीतें भाग दुसरा
गोड गोड भावगीतें भाग तिसरा
गोड गोड भावगीतें भाग चौथा
गोड गोड भावगीतें भाग पांचवा
गोड गोड भावगीतें भाग सहावा
गोड गोड भावगीतें भाग सातवा
गोड गोड भावगीतें भाग आठवा
गोड गोड भावगीतें भाग नववा
गोड गोड भावगीतें भाग दहावा

प्रत्येक पुस्तकाची किंमत फक्त आठ आणे आहे.

१ ते १० भाग एकत्र कापडी व सोनेरी बांधणी

मूल्य ५ रुपये. पोस्टेज १ रुपया

जयहिंद प्रकाशन : मुंबई २


मुखपृष्ठ छपाई : हिंद प्रिंटिंग वर्क्स : मुंबई ४